दाखल दिनांक – २९/११/२०२२
नोंदणी दिनांक – ३०/११/२०२२
निकाल दिनांक – ०४/०७/२०२६
कालावधी – ०३ व. ०७ म. ०१ दि.

**भाग 'अ'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)]**

| | |
|---|---|
| **MHSO010066852022**<br>निशाणी | **सोलापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी – श्री. ओमशंकर शिवराज पाटील)**<br>**दिनांक – ०४/०७/२०२६**<br>**सत्र खटला क्र. ३७४/२०२२** |
| **गुन्ह्याचा तपशील** | मंद्रुप पोलीस ठाणे<br>गुन्हा नोंद क्र. १७२/२०१८<br>भारतीय दंड संहितेचे कलम २७९ व ३०४ (२) तसेच<br>मोटार वाहन कायद्याचे कलम १८३ व १८४ प्रमाणे |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे – पोलीस ठाणे अधिकारी,<br>मंद्रुप पोलीस ठाणे, सोलापूर. |
| **तर्फे प्रतिनिधी** | सरकारी अभियोक्ता – श्री. डी. एम. पवार |
| **आरोपी** | **युसुफ फकरुद्दीन शेख,**<br>वय – ५९ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त,<br>रा. बाबुलाल नगर, मंद्रुप, तालुका दक्षिण सोलापूर,<br>जिल्हा सोलापूर. |
| **तर्फे प्रतिनिधी** | विधीज्ञ श्री. एम. ए. इनामदार |

## प्रपत्र क्र. ३२ भाग 'ब'
## [फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii)]

| गुन्ह्याचा तपशील | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | २८/०७/२०१८ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | २८/०७/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | १९/०८/२०१९ |
| दोषारोप निश्चित तारीख | : | २२/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | १३/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०४/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | -- |

| आरोपीचा तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले कलम | निर्दोष किंवा शिक्षा | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान निरुध्द कालावधी |
| १ | वरीलप्रमाणे | २९/०७/२०१८ | ०४/०८/२०१८ | भारतीय दंड संहितेचे कलम ३०४(२) व ४२७ प्रमाणे | निर्दोष | - | - |

## प्रपत्र क्र. ३२ भाग 'क'
## [फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]
## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकार

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | अर्जुन महादेव राठोड | फिर्यादी | १६ |
| २. | धर्मा रामचंद्र जाधव | घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार | १९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | गंगाराम रामचंद्र गायकवाड | जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार | २१ |
| ४. | बाळासाहेब टोपू जाधव | साक्षीदार | २५ |
| ५. | शमशोद्दीन बसू शेख | साक्षीदार | २६ |
| ६. | रियाज मुनीर शेख | तपासी अंमलदार | ३१ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| नाही | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| नाही | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी**

| क्रमांक | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| १. | १७ | फिर्याद |
| २. | २० | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | २२ | जप्ती पंचनामा |
| ४. | ३२ | अटक पंचनामा |
| ५. | ३३ | मरणोत्तर पंचनामा |
| ६. | ३४ | मृत्यूच्या कारणाचे तात्पुरते प्रमाणपत्र |
| ७. | ३५ | शवविच्छेदन अहवाल |
| ८. | ३६ व ३७ | तपासी अंमलदारांनी आर.टी.ओ. यांना वाहनांच्या तपासणीसाठी दिलेले पत्र |
| ९. | ३८ व ३९ | आर.टी.ओ. यांचे वाहन तपासणी बाबतचे प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| १०. | ४० | तपासी अंमलदारांनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांना दिलेले पत्र |
| ११. | ४१ | सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तपासी अंमलदारांना दिलेले पत्र |
| १२. | ४२ व ४३ | तपासी अंमलदारांनी गुन्ह्यातील कंटेनर मालकांना दिलेले पत्र |
| १३. | ४९ | डिजीटल पुराव्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १४. | ५० | छायाचित्रे |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४५ | आरोपीचा फौ.व्य.सं. चे कलम ३१३ नुसार जबाब |

**मुद्देमाल**

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | आर्टिकल 'अ' | घटनास्थळावरील फोटो |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ०४/०७/२०२६)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या (संक्षेपासाठी ‘भा.दं.सं.’) कलम ३०४ (२) व ४२७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरिता खटला चालवण्यात आलेला आहे.

२. **अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे** –

फिर्यादी अर्जुन महादेव राठोड यांनी दिनांक २८/०७/२०१८ रोजी मंद्रुप पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे

की, दिनांक २८/०७/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास त्यांचा मुलगा सुनिल अर्जुन राठोड, वय २६ वर्षे हा त्यांच्या मालकीची मोटारसायकल क्र. एम.एच.१३/बी.बी./२४५७ वरुन रेल्वेचे आरक्षण करण्यासाठी सोलापूर येथे गेला होता. त्यानंतर फिर्यादी दुपारी ०२.०० वाजण्याच्या सुमारास त्यांची पत्नी आजारी असल्याने पत्नीला दवाखान्यात उपचार घेण्यासाठी मंद्रुप येथील स्थानिक दवाखान्यात गेले होते. त्यावेळी एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांना असे सांगितले की, त्यांचा मुलगा दुपारी ०२.४५ वाजण्याच्या सुमारास लोकसेवा शाळेसमोर झालेल्या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. त्यामुळे फिर्यादी व त्यांची पत्नी लागलीच सदर ठिकाणी गेले. त्यावेळी त्यांचा मुलगा सुनिल यास तेथे हजर असलेल्या लोकांनी तात्काळ उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, मंद्रुप येथे घेवून गेले होते. त्यावेळी ग्रामीण रुग्णालय, मंद्रुप येथे जावून फिर्यादी यांनी स्वत: चौकशी केली असता लोकसेवा शाळेसमोरील राहणारा इसम नामे युसुफ फक्रुद्दीन शेख याने त्याच्या घरासमोर अनाधिकृतपणे, कोणाची परवानगी न घेता केलेल्या उंचवट्यावरुन (गतिरोधक) गाडी गेल्याने त्यांचा मुलगा सुनिल हा गाडीवरुन उडून खाली पडला. त्यावेळी पाठीमागून येत असलेल्या कंटेनर क्र. एच.आर.३८/क्यू/०२३८ चा अज्ञात चालक यास सदर कंटेनरचा वेग आवरता न आल्याने सदर कंटेनरचे चाक अंगावरुन गेले. त्यात सुनिल हा गंभीर जखमी झाला आहे. त्यानंतर ग्रामीण रुग्णालय, मंद्रुप येथील डॉक्टरांनी तात्काळ सुनिलला तपासून पुढील उपचारासाठी सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथे पाठविले. तेथे सुनिलला तपासले असता, तो उपचारापूर्वी मयत झाला असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांचा मुलगा सुनिल याचे सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथील डॉक्टरांनी सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथे शवविच्छेदन केले आहे.

**३.** फिर्यादीने दिलेल्या या आशयाच्या फिर्यादीवरुन मंद्रुप पोलीस ठाणे येथे दिनांक २८/०७/२०१८ रोजी भा.दं.सं. च्या कलम २७९, ३०४ (२) आणि मोटार वाहन अधिनियमचे कलम १८३ व १८४ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरिता गुन्हा नोंद क्र. १७२/२०१८ नोंदविण्यात आला. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास तपासिक अंमलदार पोलिस उपनिरिक्षक श्री. आर. एम. शेख यांच्याकडे देण्यात आला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच गतिरोधकबाबतची छायाचित्रे घेतली. तसेच त्यांनी गुन्ह्यातील वाहने जप्त करुन त्याबाबत जप्ती पंचनामा केला. त्यानंतर तपासिक अंमलदार यांनी वैद्यकीय कागदपत्रे प्राप्त केली. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना वाहनांची तपासणी करण्यासाठी पत्रे दिली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गतीरोधकाबाबत अहवाल प्राप्त केला. तसेच आरोपी क्र. २ बाबत

तपास केला. त्यानंतर त्यांनी महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपी क्र. १ विरुद्ध वर नमूद दंडनीय अपराधाकरिता आरोपपत्र दाखल केले आणि आरोपी क्र. २ विरुद्ध फौजदारी व्यवहार संहितेचे कलम २९९ अन्वये आरोपपत्र दाखल केले. भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४(२) अन्वये खटला चालविण्याचा अधिकार हा केवळ सत्र न्यायालयाला असल्यामुळे विद्वान ८ वे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, सोलापूर यांनी सदर खटला फौजदारी व्यवहार संहितेचे कलम २०९ अन्वये या न्यायालयाडे वर्ग केला.

**४.** माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपी क्रमांक १ युसुफ विरुद्ध भा.दं.सं. चे कलम ३०४(२) व ४२७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरिता निशाणी क्र. ९ वर आरोप निश्चित केले. आरोपाचा तपशील आरोपीला वाचून दाखविण्यात आला व समजावून सांगण्यात आला असता आरोपीने गुन्ह्या केल्याचे अमान्य करुन खटला चालविण्याची विनंती केली. अभियोग पक्षाच्या संपूर्ण पुराव्याअंती आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक पुरावा आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे निशाणी ३७ कडे निवेदन नोंदविण्यात आले. त्याचा या प्रकरणात काहीही संबंध नसून त्यांनी कसल्याही प्रकारचा गुन्हा केला नसल्याचा बचाव आरोपीने घेतलेला आहे.

**५.** विचारासाठीचे मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खाली नमूद करत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | तेरा मैल ते मंद्रुप जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर लोकसेवा शाळेसमोर आरोपीने दिशादर्शक फलक न लावता रस्त्याच्या बाजूला विनापरवाना बेकायदेशीररित्या सिमेंट कॉन्क्रीटमध्ये गतिरोधकाची उभारणी करुन दिनांक २८/०७/२०१८ रोजी दुपारी ०२.४५ वाजता मयत सुनिल राठोड यांचा खून या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध करुन भा.दं.सं. चे कलम ३०४ (२) अन्वयेचा दंडनीय अपराध केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नाही** |
| २. | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने बेकायदेशीररित्या गतीरोधक उभारणी करुन आगळीक करुन फिर्यादीच्या वाहनाचे रु. ५०/– पेक्षा जास्तीचे नुकसान करुन भा.दं.सं. चे कलम ४२७ अन्वयेचा | **नाही** |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | दंडनीय अपराध केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत</u> –**

**६.** हे दोन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे निर्धारण एकत्रितपणे करण्यात येत आहे. अभियोगपक्षातर्फे विद्वान अतिरिक्त सरकारी वकील श्री. डी. एम. पवार यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, कसल्याही प्रकारचा फलक न लावता विनापरवाना गतिरोधक तयार करणे, हे धोकादायक असून एखाद्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरु शकते, हे माहिती असताना देखील आरोपी युसुफने त्याच्या घरासमोर बेकायदेशीर गतिरोधक तयार केलेला आहे. त्यामुळे फिर्यादीच्या मुलाचा अपघाती मृत्यू झालेला आहे. आरोपीने सदर गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन निसंदिग्धपणे सिद्ध होत आहे. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांनी आरोपीविरुद्ध विनाकारण खोटी साक्ष देण्याचे काहीही कारण नाही. त्यामुळे त्यांनी आरोपीला कठोर शिक्षा करण्याची विनंती केली आहे. याउलट आरोपीचे विद्वान विधिज्ञ श्री. एम. ए. इनामदार यांनी असा जोरदार युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाने आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध केलेले नाही. त्यामुळे त्यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती केली आहे.

**७.** आरोपीविरुद्ध भा.दं.सं. चे कलम ३०४(२) व ४२७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरिता खटला चालविण्यात आलेला आहे. सदर दोन्ही कलमे मी खाली नमूद करत आहे.

> ***३०४** – जो कोणी 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध करील त्याला, ज्या कृतीमुळे मृत्यू घडून आला असेल ती कृती मृत्यू घडवून आणण्याचा किंवा ज्यामुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे अशी शारिरीक क्षती करण्याच्या उद्देशाने केली असेल तर आजीव कारावासाची, किंवा दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या*

*मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल.*

*किंवा, त्या कृतीमुळे मृत्यू घडून येण्याचा संभव आहे ही जाणीव असून, पण मृत्यू घडवून आणण्याचा किंवा जी मृत्यूला कारण होण्याची संभव आहे अशी शारिरीक क्षती घडवून आणण्याचा उद्वेश नसताना ती कृती केलेली असेल तर, दहा वर्षांपेक्षा असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होती.*

***४२७ –*** *जो कोणी आगळीक करेल आणि त्यायोगे पन्नास रुपये किंवा त्याहून अधिक रकमेपर्यंत हानी अथवा नुकसान घडवून आणील त्याला, दोन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.*

८. तपासीक अंमलदार श्री. रियाज मुनीर शेख (असा ६) हा मंद्रुप पो.स्टे. येथे सन २०१८ ते २०१९ या कालावधीत पो.उप.नि. म्हणुन कार्यरत होता. त्यांच्या साक्षीत असे आले आहे की, गुरनं १७२/२०१८ चा तपास त्यांच्याकडे दि. २८/७/२०१८ रोजी देण्यात आला. त्यांनी घटनास्थळी जाऊन दोन पंचा समक्ष घटनास्थळाचा पंचनामा (नि. २०) केला. त्यानंतर मयताची मोटरसायकल व कंटेनर जप्त केला व त्याबाबत पंचनामा (नि. २२) केला. दिनांक ३०/७/२०१८ रोजी इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर मरणोत्तर पंचनामा, मृत्यच्या कारणाचे प्रमाणपत्र व शवविच्छेदन अहवाल (नि. ३३ ते ३५) प्राप्त केले. त्यानंतर दोन्ही वाहनाची तपासणी करुन मिळण्यासाठी आरटीओ कार्यालयास दोन पत्र (नि. ३६ व ३७) दिले. त्यानुसार दोन स्वतंत्र अहवाल (नि. ३८ व ३९) प्राप्त झाले. त्यानंतर आरोपीच्या घरासमोरील अनाधिकृत बांधलेले गतीरोधक काढण्याबाबत उपअभियंता सार्वजनीक बांधकाम विभाग सोलापुर यांना पत्र (नि. ४०) दिले. सदर पत्रान्वये सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्याकडुन आरोपीने गतीरोधक बाधण्यासाठी परवानगी घेतली आहे का अशी विचारणा केली होती. त्यास सार्वजनीक बांधकाम विभाग यांनी पत्र (नि. ४१)

दिले की, सदर गतीरोधक बांधण्यासाठी परवानगी घेतली नाही व तो अनाधिकृत आहे. त्यानंतर सदरचे गतीरोधक सार्वजनीक बांधकाम विभाग यांच्या मार्फत काढण्यात आले. त्यांनी केलेल्या तपासामध्ये हे निष्पन्न झाले की, आरोपी क्र. १ युसुफ शेख यांनी अनाधिकृतरित्या सार्वजनीक बांधकाम विभागाची परवानगी न घेता कोणताही दिशादर्शक फलक न लावता रोडच्या बाजुस गतीरोधक तयार केला आहे. त्यामुळे अपघात होऊन मृत्यु होण्याची शक्यता आहे हे माहित असताना सुध्दा सदर गतीरोधक बांधला.

९. गंगाराम रामचंद्र गायकवाड (अ.सा. ३) यांच्या साक्षीत असे आले आहे की, दिनांक २९/७/२०१८ त्यांना पोलीसांनी मंद्रुप पोलीस स्टेशन येथे बालविले होते. पोलीसांनी तेथे मोटरसायकल आणि एक टाटा कंपनीचा कंटेनर जप्त करुन पंचनामा (नि. २२) तयार केला. त्यावेळेस दुसरा पंच साबळे तेथे हजर होता. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, त्यांना मोटारसायकल व कंटेनरचा नोंदणी क्रमांक सांगता येणार नाही. या पुर्वी इतर प्रकरणात त्यांनी पंच म्हणुन साक्ष दिलेली आहे. परंतु, गंगाराम हे उलटतपासात ठाम राहिले आहेत. त्यांच्या साक्षीवर अविश्वास ठेवावा असे काहीही त्यांच्या उलटतपासात निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे त्यांची साक्ष विश्वासपात्र आहे. जप्ती पंचनाम्याचे (नि. २२) अवलोकन करता असे निदर्शनास येते की, दिनांक २९/०७/२०१८ रोजी सकाळी ८.०० ते ०९.०० या दरम्यान मयत सुनिल राठोड यांची मोटारसायकल आणि टाटा कंपनीचा कंटेनर अशी दोन वाहने तपासिक अंमलदार यांनी जप्त केलेली आहेत. तपासिक अंमलदार यांनी जप्त केलेल्या वाहनांची यांत्रिक तपासणी होवून अभिप्राय मिळण्यासाठी दिनांक ३०/०७/२०१८ आणि १९/०९/२०१८ रोजी पत्रे (नि. ३६ व ३७) दिलेली आहेत. त्याप्रमाणे सदर वाहनात यांत्रिक दोष नसल्याबाबतचे अहवाल (नि. ३८ व ३९) देण्यात आला आहे.

१०. संचिकेवरील कागदपत्रे असे दर्शवतात कि, दिनांक २२/१०/२०१८ आणि १०/०१/२०१९ रोजी तपासिक अंमलदार यांनी कंटेनर क्र. एच.आर.३८/क्यू/०२३८ हे वाहन दिनांक २८/०७/२०१८ रोजी कोण चालवत होते, त्याचा पत्ता, वाहन चालविण्याचे प्रमाणपत्र इ. कागदपत्रे पाठविण्याबाबत सदन कॅरिंग कॉर्पोरेशन (इंडिया) यांना पत्रे (नि. ४२ व ४३) दिलेली आहेत. परंतु, कंटेनरच्या चालकाचा शोध घेण्यात अभियोग पक्ष

अयशस्वी ठरलेला आहे. त्यामुळे सदर चालकाविरूध्द फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम २९९ अन्वये आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

**११.** वादातील गतिरोधक काढून घेण्याबाबत तपासिक अंमलदार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिनांक ३०/०७/२०१८ रोजी पत्र (नि. ४०) दिलेले आहे. त्याप्रमाणे ए. टी. गोरे यांना सुचना देण्यात आल्याचे आणि गतिरोधक बनवताना आरोपी युसुफ फक्रुद्दीन शेख यांनी त्यांच्या कार्यालयाची परवानगी घेतली नसल्याचे आणि सदर गतिरोधक अनाधिकृत असल्याचे पत्रान्वये (नि. ४१) तपासिक यांना कळविले आहे.

**१२.** मरणोत्तर पंचनाम्यात (नि. ३३) सुनिल हा अपघातात गंभीर जखमी झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. मृत्यूच्या कारणाबाबतचे तात्पुरते प्रमाणपत्र (नि. ३४) आणि शवविच्छेदन अहवाल (नि. ३५) यामध्ये 'shock and hemorrhage due to multiple injury' या कारणामुळे सुनिलचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे फिर्यादीचा मुलगा सुनिलचा अपघातात मृत्यु झाल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केलेले आहे. त्यामुळे आरोपीने वादातील गतीरोधक तयार केला होता आणि या गतीरोधकामुळे फिर्यादीच्या मुलाचा अपघात झाला, या महत्वाच्या दोन्ही बाबी अभियोग पक्षाने निसंदिग्धपणे सिध्द करणे आवश्यक आहे.

**१३.** धर्मा रामचंद्र जाधव (अ.सा. २) यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि २९.०७.२०१८ रोजी तो तेरामैल वरुन मंद्रुपला जात होता. त्यावेळी लोकसेवा शाळे जवळ त्याला पोलीसांनी पंचनाम्यासाठी सकाळी ६.३० वाजता थांबविले होते. त्यावेळेस मयताचे वडील अर्जुन राठोड तेथे हजर होते. मयताच्या वडीलांनी घटनास्थळी गतीरोधक दाखविले. सदर गतीरोधक सिमेंट कॉन्क्रीटमध्ये केलेले होते. गतिरोधकाची लांबी सात ते आठ फुट होती व रुंदी दिड ते पाऊणे दोन फुट इतकी होती. अर्जुन राठोड यांचा मुलगा मोटारसायकलवरुन जात असताना त्या गतिरोधकामुळे पडला होता. त्यामुळे त्याचा मृत्यु झालेला होता. सदर घटनास्थळी रक्ताचे डाग पडले होते. तेथे मयताची चप्पल पडली होती. पोलीसांनी सदर घटनास्थळी पंचनामा (नि.२०) केला. त्यावेळेस सदर घटनास्थळ येथुन गतिरोधक काढण्यात आले.

**१४.** घटनास्थळ पंचनाम्याचे (नि. २०) अवलोकन करता असे निदर्शनात येते की, सदर पंचनामा रियाज शेख यांनी दोन पंचांसमक्ष दिनांक

२९/०७/२०१८ रोजी सकाळी ६.३० ते ७.३० या दरम्यान केलेला आहे. त्याप्रमाणे घटनास्थळ हे मंद्रुप शिवारातील बसव नगर ते मंद्रुप जाणारे डांबरी रोडलगत साईड पट्टीवर आरोपी फक्रुद्दीन शेख यांच्या घरासमोर आहे. त्या ठिकाणी फिर्यादी देखील हजर होता. सदर साईडपट्टी ही ७ फूट रुंदीची असून त्याच ठिकाणी दक्षिणोत्तर बनवलेला एक १.५ फूट रुंद व ८.५ फूट रुंदीची गतिरोधक असून याच गतिरोधकावरुन मयत सुनिल हा पडल्याचे फिर्यादीने सांगितले आहे. सदर ठिकाण हे वर्दळीचे असून गुन्ह्याच्या अनुषंगाने काही खाणाखुणा दिसून आल्या नाहीत. सदर ठिकाणापासून १० फूट अंतरावर उत्तरेस रस्त्यावर रक्ताचे डाग पडलेले दिसत असून त्याच ठिकाणी सुनिल याच्या अंगावरुन वाहन गेल्याचे फिर्यादीने खात्रीपूर्वक सांगितले आहे. सदर रस्ता हा पूर्व–पश्चिम चालीचा असून डांबरी आहे. मुख्य डांबरी रस्ता हा २० फूट रुंदीचा असून दोन्ही बाजूस ७ फूट रुंदीची साईडपट्टी आहे. सदर रोडच्या उत्तरेस असलेल्या साईडपट्टीवर मयत सुनिलची चप्पल पडल्याचे फिर्यादीने खात्रीपूर्वक सांगितले आहे. घटनास्थळाच्या चतु:सिमा या पूर्वेस बसव नगर १३ मैल कडे जाणारा रस्ता, पश्चिमेस मंद्रुप शहाराकडे जाणारा मुख्य रस्ता, उत्तरेस अण्णू शेंडगे यांच्या मालकीची मोकळी जागा आणि दक्षिणेस आरोपीचे घर आहे.

**१५.** धर्माच्या (अ.सा. २) उलटतपासात असे आले आहे की, मुख्य रस्त्याच्या दक्षीण बाजुस रक्ताचे डाग आणि चप्पल होती. मुख्य रस्त्याच्या उत्तर दिशेला गुन्हयाच्या अनुषंगाने काही दिसले नाही. त्यामुळे विद्वान विधिज्ञ श्री. इनामदार यांनी असा जोरदार युक्तिवाद केला कि, घटनास्थळ पंचनाम्यात (नि २०) चप्पल आणि रक्ताचे डाग हे मुख्य रस्त्याच्या उत्तर बाजुला पडल्याचे नमुद आहे. परंतु, धर्मा (असा २) मात्र सदर चप्पल आणि डाग रस्त्याच्या दक्षीणेला पडल्याचे कथन करीत आहे. त्यामुळे या पंचनाम्यावर आणि धर्माच्या (असा २) साक्षीवर विश्वास ठेवता येत नाही. परंतु, सदर घटना ही सन २०१८ मध्ये घडलेली आहे. धर्माची साक्ष सन २०२५ साली नोंदवण्यात आलेली आहे. त्यामुळे उलटलेल्या कालावधीचा विचार करता धर्माने (असा २) चप्पल आणि डाग हे दक्षीणेकडे असल्याचे कथन केल्यामुळे त्यांच्या साक्षीवर आणि घटनास्थळ पंचनाम्यावर अविश्वास ठेवता येत नाही. धर्मा (असा२) हा उलटतपासात ठाम राहिला आहे. त्यांच्या साक्षीवर अविश्वास ठेवावा असे काहीही त्यांच्या उलटतपासात निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे त्यांची साक्ष ही विश्वासपात्र आहे.

**१६.** शमशोददीन बसु शेख (अ.सा. ५) यांच्या साक्षीत असे आले आहे की, तो सार्वजनीक बांधकाम विभाग दक्षीण सोलापुर येथे २० वर्षा पासुन सन २०२४ पर्यंत मैलमजुर म्हणुन कार्यरत होता. त्यांच्याकडे तेरामैल ते कंदलगाव या रस्त्याचे देखभालीचे काम होते. दि ३१/७/२०१८ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे ओव्हरसीअर श्री गोरे यांनी त्यांना फोन करुन त्यांना सांगीतले की, घटनास्थळी बांधलेले गतिरोधक काढा. सदर गतिरोधक रस्त्याच्या साईडपट्टीला बांधलेला होता. त्याप्रमाणे त्यांनी सदर गतिरोधक काढले.

**१७.** शमशोद्दीनच्या (असा ५) यांनी उलटतपासात हे मान्य केले आहे की, रस्त्याच्या दुरुस्तीचे उरलेली माती रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी टाकलेली आहे. पुन्हा गरज पडल्यास बाजुला टाकलेली माती वापरण्यात येते. शमशोद्दीन (असा ५) यांनी पुढे हे मान्य केले आहे कि, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ओव्हरसीअरने जे काढण्यासाठी सांगीतले होते ते १० ते १२ पाटयाचा मातीचा ढिगारा होता. सदर ठिकाणी रस्त्याच्या कामाची उरलेली माती साधारणत: एक महिन्यापुर्वी पडलेली होती. त्यामुळे आरोपीचे विद्वान विधिज्ञ यांनी असा जोरदार युक्तिवाद केला कि, मुळात तथाकथीत घटनास्थळावर गतीरोधक नव्हताच. कारण शमशोद्दीनच्या कथनाप्रमाणे त्याठिकाणी १० ते १२ पाटयाचा मातीचा ढिगारा होता. परंतु, मी या युक्तिवादाशी सहमत नाही. कारण आर्टिकल 'अ' वरील छायाचित्रांचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, पहिल्या छायाचित्रात पोलीस आणि इतर लोक आणि साईडपट्टीवरील गतीरोधक दिसून येत आहे. तसेच दुसऱ्या आणि तिसऱ्या छायाचित्रात एक व्यक्ती गतिरोधक काढण्याचे काम करीत असल्याचे आणि चौथ्या छायाचित्रात गतीरोधक काढलेले दिसत आहे. तसेच छायाचित्रांबाबत (नि. ५०) प्रमाणपत्र (नि. ४९) देण्यात आलेले आहे. सदर छायाचित्रे (नि ५०) असे दर्शवतात की, घटनास्थळावर सिमेंट कॉन्क्रीटमध्ये गतिरोधक बनवण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर गतीरोधक हे सिमेंट कॉन्क्रीटमध्ये तयार करण्यात आल्याचे सिध्द होते.

**१८.** फिर्यादी अर्जुन महादेव राठोड (अ.सा. १) यांच्या साक्षीत असे आले आहे की, तो त्याच्या कुटुंबियांसह देशमुख नगर मंद्रुप येथे राहतो. सन २०१८ मध्ये २८ तारखेला घटना घडली, महिना त्यांना लक्षात नाही. त्यांचा मुलगा सुनिल रेल्वे रिझरवेशन करुन गावाकडे परत येत होता. लोकसेवा कॉलेज समोर आरोपी युसुफ शेख यांनी त्यांच्या घरा समोर गतीरोधक केलेला होता. तेथे

त्यांच्या मुलाचा अपघात झाला व तो डांबरी रस्त्यावर पडला. पाठीमागुन एक कंटेनर आला. त्याचा नंबर त्यांच्या लक्षात नाही. सदर कंटेनर हरीयाना राज्य येथील पासींगचा होता. सदर कंटेनर त्यांच्या मुलाच्या अंगावरुन गेला. सदर गतिरोधक तेथे नसता तर तो वाचला असता. त्यांना एका गावातील माणसाने सदर घटनेबाबत सांगीतले. तो त्यांच्या पत्नीला घेऊन तेथे गेला असता तोपर्यंत मुलाला ग्रामीण रुग्णालय मंद्रुप येथे आणले होते. तेथुन त्यांनी त्याला सिव्हील हॉस्पीटल सोलापुर येथे आणले. तेथे डॉक्टरांनी त्यास उपचारा पुर्वी मयत घोषीत केले. त्यांचा मुलगा आरोपीने त्याच्या घरा समोर बांधलेल्या गतिरोधकामुळे मयत झाला. त्यांनी मंद्रुप येथे पोहचल्यानंतर आंदोलन केले. त्याच दिवशी रात्री ११ वाजता मंद्रुप पो.स्टे. येथे फिर्याद (नि. १७) दिली.

**१९.** फिर्यादीच्या उलटतपासात फिर्यादीला छायाचित्रे (आर्टिकल अ) दाखविण्यात आली असता त्यात डांबरी रस्त्यावर गतीरोधक दिसत नसल्याचे कथन केले आहे. परंतु त्यांनी स्वत:हून असे कथन केले आहे की, सदर डांबरी रस्त्यावर दोन गतीरोधक शाळेच्या मुलांच्या सुरक्षीतेसाठी केलेले आहेत आणि तिसरा गतिरोधक आरोपीने व्यक्तीगत साईड पट्टीवर केलेला छायाचित्रामध्ये दिसुन येत आहे.

**२०.** फिर्यादीने हे उलटतपासात हे मान्य केले आहे की, घटनेचे ठिकाण हायवे रस्त्यावर आहे. सदरचा रस्ता साधारणता ३० ते ३५ फुट रुंदीचा आहे. सदर घटनास्थळाच्या आजुबाजुला लोकांची राहती घरे व शाळा आहे. त्यांनी अंदाजे ९ ते ९.३० वाजण्याच्या सुमारास सदर गतिरोधकामुळे त्यांच्या मुलाचा अपघात झाला म्हणुन आंदोलन केले होते. घटना झाल्यानंतर पोलीस आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यास तयार नव्हते. म्हणुन आंदोलन केल्या नंतर गुन्हा दाखल केला. मुलाच्या अपघाताबाबत एम.ए.सी.पी. क्र. ४१/२०१९ दाखल केला होता व त्यामध्ये नुकसान भरपाई मिळाली आहे.

**२१.** परंतु, फिर्यादीच्या एकंदरीत साक्षीचे अवलोकन करता असे निदर्शनास येते कि, फिर्यादीने अपघाताची घटना प्रत्यक्षात पाहिलेली नाही. तसेच फिर्यादीने स्वत: आरोपीला वादातील गतीरोधक बांधताना पाहिलेले नाही. फिर्यादीने उलटतपासात हे मान्य केले आहे की, सदर घटना त्यांनी स्वत: प्रत्यक्ष पाहीली नाही. त्यामुळे आरोपीने बेकायदेशीरपणे वादातील गतीरोधक तयार केल्याचे आणि सुनिलचा मृत्यु या गतीरोधकामुळे झाला, या दोन्ही बाबी सिध्द

करण्यास फिर्यादीची साक्ष उपयुक्त नाही.

२२. बाळासाहेब टोपु जाधव (अ.सा. ४) यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्यांचे हॉटेल तेरामैल चौकात आहे. तो दि २८/७/२०१८ रोजी दुपारी १ वाजता हॉटेलकडुन मंद्रुपकडे मोटारसायकलवर निघाला होता. मंद्रुप येथील लोकसेवा शाळेजवळ पोहचल्यानंतर तिथे एका ट्रकच्या खाली मोटारसायकल दिसली. त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता ज्या इसमाचा अपघात झाला होता तो त्यांच्या मावशीचा मुलगा होता. तो बोलण्याच्या स्थितीत नव्हता आणि. बेशुध्द होता. त्यांनी गाडी बोलवुन दवाखान्यात नेले. सदर घटनास्थळी घटनेच्या चार महिन्या पुर्वी आरोपी युसुफ शेख यांनी त्याच्या घरा समोर सिमेंट कॉन्क्रीटचे गतिरोधक बांधले होते. सदर ठिकाणी दिशा दर्शक फलक नव्हते.

२३. बाळासाहेबांच्या (अ.सा. ४) उलटतपासात असे आले आहे की, पोलीसांनी त्यांचा जबाब घटनेच्या दिवशी घेतला. त्यांच्या जबाबातील तो घटनेच्या चार महिन्यापुर्वी पडला, या मजकुराकडे बाळासाहेब (अ.सा. ४) यांचे लक्ष वेधण्यात आले असता बाळासाहेबांनी (अ.सा. ४) असे कथन केले आहे की, बरेच दिवस झाल्यामुळे त्यांना आठवत नाही की, त्यांनी चार महिन्यापुर्वी सांगीतले होते की दोन महिन्यापुर्वी. त्यामुळे आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. इनामदार यांनी असा जोरदार युक्तिवाद केला कि, बाळासाहेब यांच्या साक्षीत विसंगती आहे. त्यामुळे त्यांची साक्ष विश्वासपात्र आहे असे म्हणता येत नाही. परंतु, मी या युक्तिवादाशी सहमत नाही. कारण घटना ही सन २०१८ मध्ये घडलेली आहे आणि बाळासाहेबांची (असा ४) साक्ष सन २०२५ मध्ये नोंदवण्यात आलेली आहे. त्यामुळे उलटलेल्या कालावधीचा विचार करता वर नमुद कारणास्तव बाळासाहेबांच्या (असा ४) साक्षीवर अविश्वास ठेवता येत नाही.

२४. बाळासाहेबांच्या (असा ४) सरतपासात पुढे असे आले आहे कि, सदर घटनेच्या दोन महिन्या पुर्वी तो सुध्दा सदर गतिरोधकमुळे पडला होता व त्यांना मार लागला होता. तो गतिरोधकामुळे पडल्याने त्याने आरोपी युसुफ शेख याला गतिरोधक काढण्यासाठी विनंती केली होती. परंतु त्याने सदर गतिरोधक काढले नाही. परंतु, आरोपीला सदर गतीरोधक तयार करताना त्यांनी स्वत: पाहिले होते, हे बाळासाहेबांनी (असा ४) कथन केलेले नाही. तसेच जर खरोखरच बाळासाहेब घटनेच्या दोन महिन्यापुर्वी त्या गतीरोधकामुळे पडले असते तर निश्चितच त्यांना त्याबाबत मार लागला असता आणि त्याबाबत त्यांनी

दवाखान्यात दाखवले असते. परंतु, तसे बाळासाहेबांचे (असा ४) म्हणणे देखील नाही आणि तसा पुरावा देखील सादर करण्यात आलेला नाही. तसेच बाळासाहेबांनी (असा ४) सांगुन देखील आरोपीने गतीरोधक काढलेले नसेल तर त्याबाबत त्यांनी निश्चितच ग्रामपंचायतीकडे किंवा शासन दरबारी तक्रारी केल्या असत्या. परंतु, त्यांनी तसे काहीही केलेले नाही. त्यामुळे बाळासाहेबांच्या (असा ४) या कथनावर विश्वास ठेवता येत नाही.

**२५.** तसेच, बाळासाहेबाच्या (असा ४) एकंदरीत साक्षीचे अवलोकन करता असे निदर्शनास येते कि, बाळासाहेबांनी (असा ४) अपघाताची घटना प्रत्यक्षात पाहिलेली नाही. मोटारसायकलस्वार आणि ट्रकची धडक कशी झाली ते त्यांनी स्वत: पाहिले नसल्याचे बाळासाहेब (अ.सा. ४) यांनी उलटतपासात मान्य केले आहे. तसेच बाळासाहेबांनी (असा ४) स्वत: आरोपीला वादातील गतीरोधक बांधताना पाहिलेले नाही. त्यामुळे आरोपीने बेकायदेशीरपणे वादातील गतीरोधक तयार केल्याचे आणि सुनिलचा मृत्यु या गतीरोधकामुळे झाला, या दोन्ही बाबी सिध्द करण्यास बाळासाहेबांची (असा ४) साक्ष उपयुक्त नाही.

**२६.** रियाज शेख (असा ६) यांनी उलटतपासात हे मान्य केले आहे की, घटनास्थळ हे आरोपीच्या घरा समोर आहे हे दाखविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दोषारोप पत्रात दाखल केला नाही. त्यांनी स्वत:हुन असे कथन केले आहे की, तसे घटनास्थळ पंचनाम्यात (नि २०) नमुद आहे. परंतु, रियाज शेख यांनी उलटतपासात पुढे हे मान्य केले आहे की, सदर घर आरोपीच्या मालकीचा असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दोषारोप पत्रात दाखल केला नाही. त्यामुळे वादातील गतीरोधकाजवळ आरोपीचे घर होते, हे देखील अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही.

**२७.** रियाज शेख (असा ६) यांनी हे अमान्य केले आहे की, आरोपीने गतीरोधक बनवितानाचा नेत्र साक्षीदार मिळुन आला नाही. परंतु रियाज शेख (असा ६) यांनी स्वत:हून असे कथन केले आहे की, साक्षीदार बाळासाहेब जाधव यांनी स्वत: आरोपीस गतीरोधक बांधताना पाहीले आहे. परंतु, वर चर्चा केल्याप्रमाणे बाळासाहेबांनी (असा ४) आरोपीला गतीरोधक बनवताना पाहिले होते, असे कथनच केलेले नाही. तसेच संचिकेवरील पुराव्याचे अवलोकन करता असे निदर्शनास येते कि, घटनास्थळ हे मुख्य रस्त्यावर आहे. सदर घटनास्थळाच्या आजुबाजुला लोकांची राहती घरे व शाळा आहे. सदर ठिकाण हे

वर्दळीचे ठिकाण आहे. घटनास्थळापासुन जवळच शाळा आहे. आरोपीने स्वत: किंवा इतरांमार्फत गतीरोधक तयार केल्याचे अभियोग पक्षाच्या एकाही साक्षीदाराने कथन केलेले नाही. आरोपीच्या कथीत घराच्या शेजा–यांच्या साक्षी अन्वये अभियोग पक्षाला ही बाब सहज सिध्द करता आली असती. परंतु, त्याबाबत कसल्याही प्रकारचा पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही. त्यामुळे मुळात सदर गतीरोधक आरोपीने स्वत: किंवा इतरांमार्फत तयार केल्याचेच अभियोग पक्ष सिध्द करू शकलेला नाही.

२८. जरी काही क्षणांकरीता आरोपीनेच सदर गतीरोधक तयार केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे असे जरी गृहीत धरले तरी त्याचा अभियोग पक्षाला काहीही फायदा होणार नाही. कारण रियाज शेख (असा ६) यांनी हे अमान्य केले आहे की, अपघात पाहणारा नेत्र साक्षीदार तपासात मिळुन आला नाही. परंतु त्यांनी स्वत:हून असे कथन केले आहे की, बनसिध्द देशमुख यांनी अपघात पाहीलेला आहे. परंतु सदर बनसिध्द देशमुख यांची साक्ष अभियोग पक्षाने नोंदवलेली नाही.

२९. वादातील गतीरोधक हे साईड पट्टीवर आहे. सदर गतीरोधक मयत सुनिलच्या मृत्युस कारणीभुत आहे, हे सिध्द करण्याचा भार हा अभियोग पक्षावर आहे. सदर अपघात हा दुपारी २.४५ वाजता घडलेला आहे. वर चर्चा केल्याप्रमाणे, घटनास्थळ हे मुख्य रस्त्यावर आहे. सदर घटनास्थळाच्या आजुबाजुला लोकांची राहती घरे व शाळा आहे. सदर ठिकाण हे वर्दळीचे ठिकाण आहे. घटनास्थळापासुन जवळच शाळा आहे. परंतु, तरी देखील मयत सुनिलचा अपघात हा वादातील गतीरोधकामुळेच झालेला आहे किंवा सुनिलच्या मृत्युस वादातील गतीरोधक हे कारणीभुत होते, हे सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकाही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदवलेली नाही. त्यामुळे सदर अपघात हा वादातील गतीरोधकामुळे झालेला आहे, याबाबत संचिकेवर समाधानकारक असा पुरावा नाही. त्यामुळे वादातील गतीरोधकाच्या जवळ आरोपीचे घर आहे, वादातील गतीरोधक हे आरोपीनेच स्वत: किंवा इतरामार्फत तयार केले आणि हेच गतीरोधक मयत सुनिलच्या अपघातास कारणीभुत ठरले, हे सिध्द करण्यास अभियोग पक्ष सपशेल अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे आरोपीने दिशादर्शक फलक न लावता रस्त्याच्या बाजूला विनापरवाना बेकायदेशीररित्या सिमेंट कॉन्क्रीटमध्ये गतिरोधकाची उभारणी करुन दिनांक २८/०७/२०१८ रोजी

दुपारी ०२.४५ वाजता मयत सुनिल राठोड यांचा खून या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध करुन आगळीक करून फिर्यादीचे ५०/– रूपयापेक्षा जास्तीचे नुकसान करून भा.दं.सं. चे कलम ३०४ (२) आणि ४२७ अन्वयेचे दंडनीय अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ व २ यांचे उत्तर मी नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तराच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत

आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी युसुफ फक्रुद्दीन शेख यांची भारतीय दंड संहितेच्या कलम ३०४ (२) आणि ४२७ अन्वयेच्या दंडनिय अपराधातुन फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम २३५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे स्व बंधपत्र आणि जामीनपत्र रद्द करण्यात येते. त्याला सोडुन देण्यात येते.

३. आरोपी युसुफ यांनी फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम ४३७ (अ) अन्वये त्यांचा २५,०००/– रूपयाचा वयक्तीक जातमुचलका आणि तितक्याच रक्कमेचा जामीन निष्पादित करावा.

४. फिर्यादीच्या मोटारसायकलचे बंधपत्र, जर काही असल्यास, रद्द करण्यात येते.

५. कंटेनर चालकाविरूध्द अभियोग पक्षाने वेगळे आरोपपत्र दाखल करावे.

PATIL OMSHANKAR SHIVRAJ

Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2026.07.04 13:24:54 +0530

**(ओमशंकर शिवराज पाटील)**

दिनांक – ०४/०७/२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, सोलापूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file/order is same word to word as per the original order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | Tushar B. Zalake (Grade II) |
| b) | Court | : | Ad-hoc D.J. - 2 and A.S.J., Solapur. |
| c) | Order/Judgment signed by P.O. on | : | 04/07/2026 |
| d) | Order uploaded on | : | 04/07/2026 |